प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे करिता दिवे,ता.पुरंदर येथील जागेत ब्रेक टेस्ट ट्रॅक सुरु करण्यासाठी किमान सुविधांसाठी (शेड,शौचालय,पाणी व लाईट इ.) येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०११८/प्र.क्र.२६/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ०८ फेब्रुवारी २०१८

वाचा :

परिवहन आयुक्त यांचे क्र.बेचापं(१२)/०९१६/नक्र.२४/का.१०(१)/जा.क्र.१२२२५, दि.२१.०८.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल जनहित याचिका क्र.२८/२०१३ (श्री.श्रीकांत कर्वे वि. महाराष्ट्र शासन) प्रकरणातील आदेशानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे करिता दिवे, ता.पुरंदर येथील गट नं. ३ जि.पुणे येथील जागेवर ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात असून सदर जागेत ब्रेक टेस्ट ट्रॅक सुरु करण्यासाठी किमान सुविधा (उदा.शेड,शौचालय,पाणी,लाईट इ.) उपलब्ध करुन देण्याकरिता तसेच यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे करिता दिवे, ता.पुरंदर येथील गट नं. ३ जि.पुणे येथील जागेवर ब्रेक टेस्ट ट्रॅक सुरु करण्यासाठी आवश्यक असणा-या किंमान सुविधा उदा.शेड, शौचालय, पाणी व लाईट इ. उपलब्ध करुन देण्याकरिता सा.बां.विभागाने परिगणित केल्यानुसार पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars	Cost Rs.
1	**Cost of Work Portion (Approach)**	**28,42,419.00**
2	**Cost of Work Portion (Office)**	**70,67,838.00**
3	**Cost of Work Portion (Toilet)**	**9,75,983.00**
	(T)	**1,08,86,240.00**
	A) Add 4 % Contengencies charges	**4,35,450.00**
	B) Add 5% Centage Charges	**5,44,312.00**
	C)GST 12 % on Total	**13,06,348.00**
	Total	**1,31,72,350.00**

२. सदर मान्यता खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा,मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदाकडून मंजूरी घ्यावी.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्रक्र.१७७/ता.क्र.१,दि.१० जानेवारी २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाच्या उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा

इ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

(ई) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

उ) सदर अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे व उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांच्याकडून साक्षांकित करणे आवश्यक आहे.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र."बी-३, मुख्य लेखाशीर्ष २०४१ (०१)(०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरिता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रिम चाचणी पथ बांधणे (कार्यक्रमावरील) (२०४१ ०३२१) १३- कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७३/इमा-२, दि.०३.०२.२०१८ नुसार तसेच, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-५, अ.क्र.३, व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल २०१७ मधील परिच्छेद क्र.७ नुसार असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८१४४९५५३६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.02.08 14:56:04 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/ लेखा),परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे
१०.उप सचिव (इमा) (सार्वजनिक बांधकाम विभाग)
११.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१२.निवड नस्ती, परि-४